December 2024

# दर्पण

MAHARASHTRA MANDAL OF SOUTH FLORIDA


**दर्पण संपादकीय विभाग**

**संपादिका:** सुजाता साठे

sujatass@hotmail.com



**उप-संपादिका:** राजश्री पालकर

rajipalkar@aol.com



**मांडणी/सजावट:** अपर्णा मटंगे




## अनुक्रमणिका


| | शीर्षक | लेखक | पान क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | संपादकीय | सुजाता साठे | १ |
| २ | MMOSF चे पान | अपर्णा मटंगे | २ |
| ३. | विशेष सदर | सुजाता साठे, अपर्णा मटंगे | 3 |
| ४ | वेगळ्या वाटेवर | सुजाता साठे | ८ |
| ५ | साहित्याचे माणिकमोती | ललिता गंडभीर, शशीकला लेले, लाभेश शेवलकर, सोनाली क्षीरसागर शिंगण | १3 |
| ६. | सफरनामा | शीला सोगल | २3 |
| ७. | खाना खजाना | पुष्कर मराठे, डॉ. शुभांगी कुंभार | २७ |
| ८ | सिनिअर्स कॉर्नर | डॉ. नीलकंठ पालकर | २९ |
| ९ | किड्स कॉर्नर | तन्वी भिडे, अवंती भिडे, अन्वित शेवलकर, मेल्वा देशमुख, पार्थ कर्डेल, अक्षित शेवलकर, नलिनी काळे, अनुषा काळे | 3० |
| १० | प्रश्नमंजुषा | रसिका जोशी | 3८ |
| ११ | उत्तर सांगा पाहू? (उत्तर) | रसिका जोशी | ४० |


*अस्वीकरण - या अंकात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी व चित्रांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.*

# संपादकीय

आपल्या दसरा-दिवाळीसारखेच लागोपाठ येणारे अमेरिकन सण म्हणजे थँक्सगिविंग आणि ख्रिसमस. थॅंक्सगिविंग ते १ जानेवारीला नवीन वर्ष सुरु होईपर्यंत हॉलिडे सीझन म्हणायची पद्धत आहे. त्यात हानुका, क्वानझा हे सणही येतात. मला आवडणारी इथली एक पद्धत म्हणजे ह्या सीझनला मोठया प्रमाणात आपल्या समाजाचे ऋण फेडायचा लोक प्रयत्न करतात. तुम्ही पैशाची मदत करा किंवा एखाद्या चॅरिटीसाठी स्वेच्छेने काम करा. ते तुमचे आयुष्य समृद्ध करते आणि तुम्ही राहता त्या समाजाबरोबर तुमची ओळख होते.

लहानपणापासून मुलांच्या मनावर हे कसे ठसते, ह्याचे आमच्या घरातलेच एक उदाहरण सांगते. माझ्या अमेरिकन सुनेचे आई-वडील आमच्या दोन नातवांना जेव्हा वाढदिवसाला किंवा ख्रिसमसला, पैसे भेट म्हणून देत, तेव्हा ते कसे खर्च करायचे हे पण सांगत. एकूण पैशाच्या १/३ पैसे कुठल्यातरी चॅरिटीला द्यायचे, १/३ पैसे वाचवून (save) ठेवायचे आणि उरलेले १/३ तुम्हाला काय पाहिजे ते विकत घ्यायला खर्च करायचे. मला ही पद्धत खूप आवडली.

४०० वर्षांपूर्वी, ब्रिटिश पिलग्रिम्सनी नेटिव्ह इंडियन्स बरोबर भरपूर पीक आले म्हणून देवाचे आभार मानण्यासाठी साजरा केलेला थॅंक्सगिविंग हा सण, आता अमेरिकन जीवनाचा अविभाज्य भाग झाला आहे. थँक्सगिविंगला कुठल्याही धर्माचे बंधन नाही. फक्त आपल्याला जे मिळाले आहे, त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करायची. नेहेमी माणसाचा स्वभाव माझ्याकडे काय नाही म्हणून तक्रारी करायचा असतो. हा दिवस आपल्याहून किती तरी अभागी लोक आपल्याभोवती आहेत ह्याची जाणीव करून देतो. आपल्याजवळ असलेली प्रेमाची माणसे, मित्रमंडळी आणि सहज मिळणारे सुग्रास अन्न ह्याचे जीवनातले महत्व कळते. ह्या सणाला गुरुवारी घरोघरी टर्कीचे जेवण शिजते. वेगवेगळ्या रुचकर भाज्या, ब्रेड्स, सॅलड्स, गोड पदार्थ ह्यांची रेलचेल असते.

नंतर खिसमस आला की तर सगळे वातावरणच बदलून जाते. सगळ्या घरांवर, बिल्डींग्सवर सुंदर लाइटिंग, सगळीकडे सजवलेली ख्रिसमस ट्रीज, गृहिणींची घरे सजवणे, वेगवेगळ्या कुकीज, केक बेक करणे अशी चाललेली लगबग, टी व्ही वर ख्रिसमसचे प्रोग्रॅम्स, मुव्हीज, ख्रिसमस पार्टीज, दुकानातले सेल्स, आणि सगळ्यांची भेटवस्तू घेण्यासाठी चाललेली धावपळ! तुम्ही ख्रिश्चन धर्माचे नसलात तरी आपल्या भोवतालच्या लोकांचा हा उत्साह संसर्गजन्य असतो. खूप लोक मुलांची हौस म्हणून घरी ट्री आणून सजवतात. लहान मुलांचा तर हा आवडता सण! ती सॅन्टाकडून काय मागायचे ह्याची यादी करण्यात दंग असतात. लोक आपल्या कुटुंबियांसोबत हा सण साजरा करण्यासाठी जीवाचे रान करतात. कारने, विमानाने गर्दी, अडचणी सोसून प्रवास करतात. ख्रिसमसची जादू आणि आनंद वातावरणात भरलेला जाणवतो.

तर तुमच्या आनंदात हा डिसेम्बरचा 'दर्पण'चा अंक आणखी भर घालेल अशी आशा करते. ह्या वेळेच्या अंकात आपल्या बाल विभागासाठी खूप छान साहित्य आले आहे. दोन सुंदर कविता आणि लेक वर्थच्या मराठी शाळेतल्या मुलांनी पाठवलेली सुंदर चित्रे व छोटे लेख, तुम्हाला नक्कीच आवडतील. मराठी शाळेतल्या मुलांची प्रगती कौतुकास्पद आहे. सर्व शिक्षकांचे व पालकांचे अभिनंदन!

बघता बघता २०२४ साल संपत आले. जुन्या वर्षातील अप्रिय घटना विसरून, सकारात्मक ऊर्जेने नवीन वर्षाचे स्वागत करू या. नवीन वर्ष सगळ्या 'दर्पण'च्या वाचकांना आणि त्यांच्या कुटुंबियांना सुखाचे, आनंदाचे व भरभराटीचे जावो ही सदिच्छा!

**लेखिका - सुजाता साठे**
sujatass@hotmail.com

# MMOSF चे पान

नमस्कार मंडळी,

बघता बघता वर्षाच्या शेवटच्या महिन्याकडे आपण येऊन पोहोचलो आहोत! आणि २०२४ च्या जानेवारीपासून सुरु झालेल्या ह्या टीमच्या कारकिर्दीचे पहिले वर्षदेखील सरत आले!!. संक्रांत, होळी-पाडव्याची सहल, महाराष्ट्र दिनाचे मराठी नाटक, गणपती सोहळा, कोजागिरी on the beach आणि दिवाळी गृहलक्ष्मी स्पर्धा ह्या वार्षिक कार्यक्रमांसोबत सोबत, 'आईच्या गावात मराठीत बोल' व 'स्वातंत्र्य वीर सावरकर' हे दोन सिनेमे, व 5K Walk for a cause आणि Hurricane relief fund donation drives असे कार्यक्रम आपण ह्या वर्षात राबवले.

MMOSF २०२४ ह्या वर्षी १५८ जणांनी वार्षिक सभासदत्व घेतले. ह्या सर्व सभासदांना MMOSF ने दिवाळीनिमित्त खास भेट दिली. प्रत्येक सभासदाचे आडनांव व सोबत सरस्वतीचे मंडळ असलेली छान फ्रेम खास पुण्याहून करून घेतली. सर्व सभासदांना अशा फ्रेम्स दिल्या व विद्यार्थी सभासदांना त्यांच्या नावाचे ट्रे देण्यात आले. ही अनोखी भेटवस्तू सर्वांच्या पसंतीस पडली, हे तुम्ही पाठवलेल्या मेसेजस आणि प्रतिसादातून कळून आले, हीच आमच्यासाठी पोचपावती आहे!!

MMOSF मराठी शाळेच्या २ शाखा दर रविवारी लेक वर्थ व डेव्ही येथे कार्यरत आहेत, ज्यात ४५ मुले मराठी शाळेत येतात. मराठी शाळेच्या मुलांनी १ मे च्या आपल्या कार्यक्रमात भाग घेऊन 'बहू असोत सुंदर संपन्न की महा' हे महाराष्ट्र गीत म्हंटले. गणपतीचा सांस्कृतिक कार्यक्रम 'महाराष्ट्राची माती, महाराष्ट्राची ख्याती' ह्यात अंतर्गत, मराठी शाळेच्या २० हुन अधिक मुलांनी 'जयजय महाराष्ट्र माझा' हे गीत म्हंटले आणि दिवाळी २०२४ मध्ये २७ मुलांनी संक्षिप्त रामायण सादर केले. शाळेच्या मुलांचा आपल्या मंडळाच्या कार्यक्रमांत सक्रिय भाग आहे आणि मुले अगदी उत्स्पूर्तपणे भाग घेतात, हे पाहून खरंच खूप आनंद होतो. MMOSF मराठी शाळेत शिकवणाऱ्या आपल्या सर्व शिक्षक आणि स्वयंसेवकांचे ह्या कार्यात खूप मोठे योगदान आहे. त्या सर्वांच्या प्रयत्नांमधूनच आपली पुढची पिढी मराठी भाषा बोलायला, वाचायला, ऐकायला आणि लिहायला शिकत आहे!! शिकवणाऱ्या आपल्या सर्व शिक्षक आणि स्वयंसेवकांना मानाचा मुजरा!!

मंडळी, नावीन्यपूर्ण आणि वैविध्यपूर्ण कार्यक्रम घेऊन येणे आणि मराठी शाळेचा सुरळीत विस्तार आणि प्रयोजन होत राहणे हेच आमच्या कार्यकारिणीचे ध्येय आहे. हे साध्य होण्यासाठी मंडळाला तुमच्या सहकार्याची आणि मदतीची कायम स्वरूपी गरज लागते. आपल्या MMOSF Outreach आणि MMOSF Events ग्रुपवर अनेकजण आहेत, ज्यांनी अजून मंडळाचे सभासदत्व घेतलेले नाही.

आपण सर्वजण आपला देश सोडून, सातासमुद्रापार आपला संसार, आपले अस्तित्व, आपले संस्कार, आपले रीतिरिवाज आणि आपले सणवार जपतो. मराठी मंडळ त्या सर्वांची सामूहिक पद्धतीने सांगड घालते. आपल्या community outreach वर आणि MMOSF Events वर असणाऱ्या सर्वांना माझी नम्र विनंती आहे, की आपल्या साऊथ फ्लोरिडामधल्या मराठी माणसांनी एकत्र येवून आपली एकजूट घडवणे आणि आपल्या सणावारांना मराठमोळे स्वरूप देणे खूप गरजेचे आहे. आपल्या आजूबाजूला अनेक प्रांतांच्या स्वतंत्र संस्था आहेत, ज्यांच्या मार्फत त्या त्या प्रांतांचे लोक एकत्रित येतात. महाराष्ट्र मंडळ ऑफ साऊथ फ्लोरिडा ही आपली Tax exempt संस्थादेखील महाराष्ट्राच्या सावलीत व मराठी भाषेच्या कुशीत वाढलेल्या सर्वांना आग्रहाचे आमंत्रण देते. तसेच MMOSF चे सभासदत्व घेणे ही मराठी आणि महाराष्ट्र प्रिय असलेल्या माणसाची नैतिक जबाबदारी आहे असे समजून आणि सर्वानी एकत्रित येऊन मंडळाचे अस्तित्व आणखी मोठे, सुधृढ आणि सशक्त करायचे आवाहन करते. ह्या वर्षी तुम्ही जसे सहकार्य MMOSF ला दिलेत, तसेच किंबहुना ह्याहीपेक्षा जास्त २०२५ ह्या वर्षी देखील द्याल अशी मी आशा करते.

Wishing you all a delightful Holiday Season and a very happy 2025!!

**लेखिका - अपर्णा मटंगे**
president@mmosf.org

## विशेष सदर

# MMOSF गृहलक्ष्मी - खेळ स्वरोवस्की पैठणीचा

ह्या वर्षीच्या MMOSF च्या दिवाळीला मंडळाने एक मनोरंजक स्पर्धा जाहीर केली. महाराष्ट्रात अतिशय लोकप्रिय असलेल्या 'होम मिनिस्टर' ह्या प्रोग्रॅमवर आधारित 'गृहलक्ष्मी' हा कार्यक्रम करायचे ठरले. ह्या स्पर्धेसाठी The Silk Trends ह्या साडीच्या दुकानाने ३ सुंदर साड्या बक्षीस म्हणून जाहीर केल्या. पहिले बक्षीस ५०० डॉलर्सची पैठणी, दुसरे बक्षीस १५० डॉलर्सची पैठणी आणि तिसरे बक्षीस १०० डॉलर्सची कांजीवरम सिल्कची साडी असे होते. सांगायला खूप आनंद होतो की ह्या स्पर्धेला लोकांनी खूप उत्साहाने प्रतिसाद दिला.

ह्या स्पर्धेत खालील १६गृहलक्ष्मीन्नी भाग घेतला.

१) ऋजुता थत्ते
२) नमिता विशे
३) मोनाली नखाते
४) प्रांजली चौधरी
५) शुभांगी कुंभार
६) अवंती शेवलकर
७) सारा वैद्य
८) चिनार पवार
९) दीपिका ईनरकर
१०) वेत्रवती रानडे
११) श्रद्धा जवंजाळ
१२) वेदवती जोशी
१३) कीर्तिदा शहा
१४) प्रीती जोशी
१५) डायना सीक्केरिया
१६) रश्मी तेलावणे

भाग घेतलेल्या सगळ्या स्पर्धकांचे अभिनंदन!

सर्व प्रथम सगळ्या बायकांनी स्टेजवर येऊन स्वतःची आणि मग आपआपल्या जोडीदारांची छान उखाणे घेऊन ओळख करून दिली. मग स्पर्धेला खरी सुरुवात झाली. पहिल्या फेरीत सगळ्या बायकांना सर्व कडधान्ये एकत्र केलेली एक झिपलॉक बॅग देण्यात आली. त्यातून ५० पांढरे वाटणे आणि ५० हिरवे वाटाणे वेगळे करायचे होते. सर्वांत पटकन आणि बरोबर करणाऱ्या १२ बायका ही फेरी जिंकल्या.

दुसऱ्या फेरीत प्रत्येक स्पर्धकाला १० बॉल्स देण्यात आले. ठराविक अंतरावरून हे चेंडू एका बकेटमध्ये टाकायचे होते. ह्या फेरीतून ८ बायका पुढच्या फेरीत पोचल्या.

MAHARASHTRA MANDAL OF SOUTH FLORIDA



तिसऱ्या फेरीतला खेळ जोडीने खेळायचा होता. प्रत्येक नवऱ्याने बायकोच्या डोळ्यावर पट्टी बांधली. मग बायकोने एका बाऊलमधले कॉटन बॉल्स चमच्याने दुसऱ्या बाउल मध्ये टाकायचे होते. नवऱ्याने मदत न करता नुसत्या तोंडाने सूचना द्यायच्या. ह्या फेरीत ५ बायका पुढे गेल्या.

चौथ्या फेरीतील खेळही दोघांनी मिळून खेळायचा होता. दोघांनी एक रंग ठरवायचा आणि त्या रंगाच्या ५ वस्तू प्रेक्षकांकडून घेऊन यायच्या. ह्या फेरीतून शेवटच्या फेरीसाठी तिघींची निवड झाली. वेदवती जोशी, प्रांजली चौधरी आणि शुभांगी कुंभार ह्या तिघीजणींनी ही बाजी जिंकली.

पाचव्या फेरीत स्टेजवर एक हुला हूप दोघांनी धरले होते. प्रत्येकीने बॅडमिंटन रॅकेटने शटलकॉक हुला हूप मधून मारायचे. २ मिनिटात ज्या दोघी जास्ती शटलकॉक मारतील त्या दोघी शेवटच्या फेरीत जातील. तिसऱ्या नंबरची कांजीवरम साडीची विजेती ठरेल. वेदवती जोशीला ही कांजीवरम साडी व त्याला मॅचिंग बटवा मिळाला. तसेच निरंजन जोशीला पैठणीचे जॅकेट मिळाले.







तर एवढया राऊंड्स जिंकून शुभांगी कुंभार व प्रांजली चौधरी ह्या शेवटच्या स्पर्धेसाठी निवडल्या गेल्या. ही फेरी कठीण होती. त्यांत तीन वेगवेगळ्या गोष्टी करायच्या होत्या. पहिले काम ३ सुयांमधुन धागे ओवायचे, मग ५ पोळ्या लाटायच्या आणि शेवटी एका हाताने पेपर कप्सचा मनोरा रचून एका हाताने काढायचा. ही स्पर्धा खूप चुरशीची झाली. प्रेक्षक दोघींनाही प्रोत्साहन देत होते. प्रांजली ह्या स्पर्धेची विजेती ठरली व तिला ५०० डॉलर्सची पैठणी मिळाली. निळ्या रंगाची व त्यावर स्वरोवस्कीचे क्रिस्टलस लावलेली ही पैठणी फारच सुंदर होती.
प्रांजलीला त्यावर मॅचिंग बटवा देखील मिळाला. आलाप चौधरीला पैठणीचे जॅकेट मिळाले. तर शुभांगी कुंभार दुसऱ्या क्रमांकाची विजेती ठरून तिला १५० डॉलर्सची पैठणी व मॅचिंग बटवा मिळाला. तसेच अभय कुंभाराला पैठणीचे जॅकेट मिळाले.

तीनही विजेत्या बायकांचे अभिनंदन! त्यांचे साड्यांमधले फोटो पाहिल्यावर तुम्हाला त्यांना किती आनंद झाला आहे हे दिसेलच. तसेच "The Silk Trends" आणि 'निमंत्रण' ह्यांच्या सौजन्याने इतक्या सुंदर साड्या व पैठणी ची जॅकेट बक्षीस दिल्याबद्दल त्यांचे आभार! MMOSF असेच उत्तमोत्तम कार्यक्रम पुढेही आपल्या सर्वांसाठी सादर करतील ह्याबद्दल मला खात्री आहे.

**लेखिका - सुजाता साठे**
sujatass@hotmail.com

# विशेष सदर

## MMOSF मराठी शाळा प्रस्तुत - संक्षिप्त रामायण

दिवाळी २०२४ च्या कार्यक्रमाचे आणखी एक कौतुकास्पद सादरीकरण म्हणजे मोसफ मराठी शाळेच्या मुलांनी सादर केलेले 'संक्षिप्त रामायण'.

रामायणाची गोष्ट अगदी १५ मिनिटात सादर करणे खरोखरीच कठीण आहे, आणि त्याला जोड म्हणजे त्यात भाग घेणाऱ्या २७ मुलांना वेगवेगळ्या भूमिका देणे आणि त्यांचे संवाद लिहिणे. प्रत्येक विद्यार्थीला किमान एक संवाद असलाच पाहिजे,आणि सोबत वेळेची मर्यादा देखील सांभाळत हा dream project प्रस्तुत करायचे शिवधनुष्य मराठी शाळेच्या शिक्षिका संकल्पा हुद्देदार ह्यांनी पेलले.



लेक वर्थ आणि डेवी शाखेच्या मुलांनी ह्यामध्ये भाग घेतला. सर्व शस्त्र-वस्त्र, अलंकार व आभूषणांची जबाबदारी उचलली शाळेच्या स्वयंसेवक नीला इनामदार आणि रेखा केळुसकर, व शिक्षिका संकल्पा हुद्देदार ह्यांनी. मुलांना संवाद लक्षात ठेवून म्हणायची जोखीम नको म्हणून सर्व संवाद आधीच ध्वनिमुद्रित केले गेले. ध्वनीमुद्रणाची आणि नंतर त्याला सुरांची आणि संगीताची झालर लावायची सर्व जबाबदारी अपर्णा मटंगेनी पेलली.

संक्षिप्त रामायण हा खरोखरच dream project होता, जो केवळ ३ आठवड्यात बसविण्यात आला. ह्या मुलांच्या तालमी झूम वर व्हायच्या. ३ आठवड्यामध्ये हा प्रोजेक्ट, virtuality to reality साकार झाला. मुलांनी एकमेव एकत्रित तालीम कार्यक्रमाच्या केवळ एक तास आधी केली.

मुलांचे कौतुक करावे तेवढे थोडे, पण त्याच बरोबर ह्या कौतुकाचे हकदार त्यांचे पालक देखील आहेत.  पालकांनी त्यांच्याकडून रियाज करून घेतला, आणि मुख्य म्हणजे रामायण प्रोजेक्ट वर त्यांनी दाखवलेला विश्वास खूप मोलाचा होता!!

उपस्थित सर्व प्रेक्षकांची मने ह्या सर्व मराठी शाळेच्या मुलांनी जिंकली!!

जय श्री राम!!

**लेखिका - अपर्णा मटंगे**
president@mmosf.org

## वेगळ्या वाटेवर

# पुष्कर मराठे: एक स्वादिष्ट सफर

तुम्हाला कधी असा प्रश्न पडलाय का? काहीतरी खास प्रसंग, तुम्हाला सगळ्या मित्रमंडळी आणि कुटुंबियांबरोबर साजरा करायचा आहे. पण आपल्या भागात भरपूर इंडियन रेस्टारंटस असली तरी असे वेगळे, अगदी खास नाव डोळ्यासमोर येत नाही. पण वेस्ट पाम बीचला राहणाऱ्या बहुतेक लोकांना हा प्रश्न पडत नाही. Stage आणि Ela ही अशी दोन रेस्टॉरंटस आहेत जिथे त्यांना पाहिजे तसे चविष्ट आणि दर्जेदार जेवण नक्कीच मिळते. आणखी दुधात साखर म्हणजे ही दोन्ही रेस्टारंटस आपल्या मराठी माणसाची आहेत. पुष्कर मराठे ह्या तरुण उद्योजकाने अतिशय मेहेनत घेऊन लोकांचा हा विश्वास मिळवला आहे.



**मी**: “पुष्कर, तुझ्या Stage (ह्याचा उच्चार stahj असा आहे आणि फ्रेंच भाषेत त्याचा अर्थ apprentice chef असा होतो) रेस्टॉरंटमध्ये मी जेवले आहे आणि खूप छान जेवण होते. मेन्यू खूप वेगळा आहे. ह्या सगळ्याची सुरवात कशी झाली?”

**पुष्कर**: “आम्ही नागपूरचे राहणारे असलो तरी माझ्या लहानपणी वडील इंडियन एयर फोर्समध्ये रडार टेक्निशियन म्हणून काम करायचे. त्यामुळे त्यांच्या २-३ वर्षांनी बदल्या व्हायच्या. मी लहानपणी आग्रा, पठाणकोट, नाशिक, जामनगर अशा वेगवेगळ्या ठिकाणी राहिलो आहे. एयर फोर्समध्ये खूप cosmopolitan वातावरण होते. माझे मित्रही बंगाली, ख्रिश्चन, मुस्लिम असे होते. त्यामुळे वेगवेगळ्या पद्धतीच्या जेवणाची ओळख झाली. शिवाय लहानपणी सुट्टीत आजीकडे राहिल्याने मराठी जेवणही आवडत होते. मी सहावी पास झाल्यावर वडील नागपूरला राहायला आले.”

**मी**: “मग नागपूरला आल्यावर नवीन शाळा, वातावरण कसे वाटले? तिथे आवडले का?”

**पुष्कर**: “मी सहावीपर्यंत खूप छान विद्यार्थी होतो. पण नागपूरच्या मराठी शाळेत (हडस हायस्कूल) जेमतेम पास झालो. कारण मला मराठी तेवढे चांगले येत नव्हते. ह्याच वेळी वडिलांनी काही पैशाच्या अडचणींमुळे केटरिंगचा धंदा सुरू केला. त्यांच्याकडे काम करणारे सगळे कुकस खूप छान जेवण करायचे. तेव्हा मी मदत म्हणून सगळे डबे लोकांकडे घेऊन जायचो. मला सगळ्या कुकसकडून खूप गोष्टी शिकायला मिळाल्या व मला ते काम आवडू लागले. तसेच माझ्या आत्याचे दादरला ‘प्रकाश रेस्टॉरंट’ होते. मी तिथे उन्हाळ्याच्या सुट्टीत काम करायचो. तेव्हाच मला केटरिंग कॉलेजला जावे असे वाटू लागले. ह्या काळात मला पैशाचे महत्वही कळले.”

**मी**: “मग शाळा झाल्यावर कॉलेजला कुठे गेलास? केटरिंग कॉलेजला जायला घरच्यांचा विरोध होता का?”

**पुष्कर**: “हो. त्यांना मी मेडिकल कॉलेजला जावे असे वाटत होते. पण मला त्यात रस नव्हता. मी भोपाळच्या Institute of

Hotel Management मध्ये प्रवेश घेतला व तिथून B.Sc.ची पदवी घेतली. सर्व कॉलेजचे शिक्षण मी स्वतःच्या खर्चाने केले. भोपाळला पार्ट टाईम कामे केली, केटरिंगच्या कामात मदत केली, वेटर म्हणूनही काम केले. कुठलेही काम मला कमी दर्जाचे वाटत नाही.”

एवढ्या लहान वयात पुष्करने स्वतःच्या खर्चाने कॉलेज पूर्ण केले म्हणून मला त्याचे कौतुक वाटले. डिग्री मिळाल्यावर त्याने दीड वर्षे मुंबई एयरपोर्टच्या ‘सहार स्टार हॉटेल’ मध्ये मॅनेजमेंट ट्रेनी म्हणून काम केले. ताज हॉटेलचे शेफ पवार ह्यांच्या हाताखाली ४ महिन्यात त्याने सर्व शिकून त्यांचा विश्वास संपादन केला व अवघ्या बावीसाव्या वर्षी Sous Chef म्हणून त्याला बढती मिळाली. तेव्हा त्याच्या हाताखाली ५ शेफ काम करायचे. परंतु पुष्करला आणखी शिकायची ईच्छा असल्याने तो तिथे फार काळ रमला नाही.



२००६ साली स्टुडंट लोन काढून त्याने एक वर्ष Lucerne, Switzerland इथे Advance Diploma in Culinary Management हा अभ्यासक्रम पूर्ण केला. इथेही वेगवेगळी कामे करून त्याने स्वतःच्या खर्चापुरते पैसे मिळवले. त्याची एक गंमतीदार आठवण त्याने सांगितली. लूसर्नला एकदा Annual Fair मध्ये त्याने पाच हजार समोसे विकायचे ठरवले. एका मित्राच्या जागेत काही लोकांना तासाला १० स्विस फ्रँकस देऊन मदतीला बोलावले. ते रोज ५०० समोसे करून फ्रीज करायचे. एक फ्रँकला एक समोसा असे विकून त्याला ३५०० फ्रँकसचा फायदा झाला!




डिप्लोमा पूर्ण झाल्यावर त्याने J W Marriott, Switzerland इथे कामासाठी इंटरव्हू दिला. त्यांनी त्याला USA मध्ये ३ ठिकाणी जॉब मिळू शकेल असे सांगितले. त्याने Fort Lauderdale निवडले. इथल्या हार्बर मॅरिऑट मध्ये त्याने एक वर्ष शेफ म्हणून काम केले. पण एका वर्षात व्हिसा संपल्याने त्याला परत मुंबईला जावे लागले. तो खूप निराश झाला कारण अजून सगळे लोनचे पैसे परत केलेले नव्हते. मग त्याने डोहा, कतार इथल्या Ritz Carlton मध्ये ९ महीने काम केले. तिथे त्याला चांगला अनुभव मिळाला. पण त्याला तिथे राहायला आवडले नाही. त्याच वेळी Fort Lauderdale मधल्या एका शेफ मित्राने त्याला करेबियन मधल्या Cayman Island मध्ये जॉब करण्यासाठी विचारले. तिथल्या ‘The Brasserie’ ह्या रेस्टॉरंट मध्ये त्याने अडीच वर्षे काम केले. तिथे त्यांची स्वतःची ऑर्गनिक बाग होती, स्वतःच्या कोंबड्या पाळायचे. असे सर्व चांगले चाललेले असतांना त्याला डोहाला भेटलेल्या मित्राचा फोन आला. त्याने मुंबईच्या खूप प्रसिद्ध ‘Ellipsis’ ह्या कोलाबा भागातील रेस्टोरंट मध्ये कामासाठी विचारले. त्याला ही संधी खूप चांगली वाटली.

**मी**: “मग मुलगा परत भारतात आल्याचा आई वडिलांना खूप आनंद झाला असेल.”

**पुष्कर**: “हो ना. मलाही तिथे आवडेल असे वाटले. पण तसे झाले नाही. एक वर्ष राहून मी माझी टीम तयार केली. परंतु तिथे माझे मतभेद होऊन मी तो जॉब सोडला. ह्या काळात आई-वडिलांनी माझे लग्न जमवायचा प्रयत्न केला. मी कांही मुलीही बघितल्या. पण मला ती पद्धत आवडली नाही. त्याच वेळी मला Cayman Island मध्ये भेटलेल्या मित्राच्या ओळखीने लॉस अंजेलीसच्या J W Marriott मध्ये Chef De Cuisine म्हणजे मुख्य शेफ म्हणून काम मिळाले. ह्या वेळी मला J1 व्हिसा मिळाला होता. इथे मी माझी स्वतःची अशी cooking style निर्माण केली. फार्म टु टेबल अशी पद्धत सुरू केली. वेगवेगळे भारतीय मसाले वापरुन फ्यूजन पदार्थ बनवले. ते सगळ्यांना खूप आवडले. आणि इथेच माझ्या आयुष्याला एक वेगळे वळण मिळाले.”

**मी**: “ही खूपच चांगली संधी मिळाली तुला. तुझे आयुष्य बदलणारी अशी कोणती गोष्ट घडली?”

**पुष्कर**: “मॅरीऑटच्या स्टाफ ट्रेनिंग मध्ये माझी निकोल जॅकसन ह्या मुलीशी ओळख झाली. ती तिथे अकाउंटंट म्हणून काम करत होती. आम्ही दोघे एकमेकांच्या प्रेमात पडलो. आणि फारसा वेळ न दवडता LA च्या कोर्ट हाऊसमध्ये दोघेच जाऊन लग्न करून आलो.”

**मी**: “काय? घरी आई-वडिलांना कळवले नाहीस? आणि निकोलची फॅमिली पण नव्हती?”

**पुष्कर**: “नाही. आम्ही दोघांनीच जाऊन लग्न केले. लगेच आम्हाला मुलगा झाला तेही घरी कळवले नाही.”

मला एकेक आश्चर्याचे धक्के बसत होते.

**पुष्कर**: “मला हे सगळे फोनवर आईवडिलांना सांगायचे नव्हते. मुलगा तोयम एक वर्षाचा झाला तेव्हा आम्ही सगळे नागपूरला जाऊन आईवडिलांना भेटलो. त्यांनाही सुरवातीला धक्का बसला पण तेवढाच आनंदही झाला. त्यांनी आमचे, नातवाचे खूप कौतुक केले.”



*With Aai , Baba And Andrew Dugard*

**मी**: “तोयम हे नांव मी कधी ऐकले नव्हते. त्याचा अर्थ काय आहे?”

**पुष्कर**: “तोयम म्हणजे संस्कृतमध्ये ‘पाणी’. त्याचे डोळे त्याच्या आईसारखे निळे आहेत. समुद्राच्या पाण्यासारखे. म्हणून त्याचे नांव आम्ही तोयम ठेवले. तो आता दहा वर्षांचा आहे.”

अर्थ कळल्यावर मला हे नांव खूप आवडले. २०१५ मध्ये त्या दोघांनी वेस्ट पाम बीचला निकोलच्या कुटुंबाजवळ येण्याचे ठरवले. इथे एक घरही भाड्याने घेतले. पण तेवढ्यात पुष्करला बहामामधल्या हार्बर आयलंड मध्ये जॉब मिळाला. तिथले Pink Sands Resort खूप प्रसिद्ध आहे. पण त्यांना तिथे खूप एकटेपणा जाणवला आणि एका वर्षातच ते परत आले.

**मी**: “मग परत आल्यावर Stage रेस्टॉरंट सुरू केले का?”

**पुष्कर**: “नाही. मी २०१७ ते २०१९ मध्ये प्रथम मायामीच्या ‘Ghee’ ह्या रेस्टॉरंट मध्ये आणि नंतर वेस्ट पाम बीचच्या ‘Meat Market Steak House’ इथे काम केले. इथे मला Liverpool, UK इथला Andrew Dugard भेटला. त्यालाही नवीन रेस्टॉरंट

सुरू करण्याची ईच्छा होती. आम्ही दोघांनी खूप जागा बघितल्या. वेस्ट पाम मधले क्रॅब हाऊस रेस्टॉरंट बंद झाले होते. ती जागा आम्हाला आवडली व तिथे आम्ही २०२० साली Stage रेस्टॉरंट सुरू केले."




**मी**: "सुरुवातीला जम बसायला वेळ लागला का?"

**पुष्कर**: "हो ना. आम्ही स्टेज रेस्टॉरंट सुरू केले आणि कोविडमुळे सगळे बंद झाले!"

**मी**: "खरंच की! नवीन धंदा सुरू करतांना पहिलेच मोठे संकट आले."

**पुष्कर**: "पण थोड्याच दिवसात आम्ही Takeout Menu सुरू केला. त्याला आम्हाला चांगला प्रतिसाद मिळाला. विशेषतः बुधवार ते शनिवार खूप लोकांच्या ऑर्डर्स असायच्या. आम्ही मेन्यूमध्ये जगभरच्या वेगवेगळ्या देशांमधले पदार्थ देण्याचा प्रयत्न केला. आणि लोकांना ते पदार्थ खूप आवडले. लवकरच आमचे रेस्टॉरंट खूप नावाजले जाऊ लागले. पण मला पूर्ण भारतीय पदार्थ असलेले रेस्टॉरंट काढायची ईच्छा होती. मग २०२२ मध्ये छोटया जागेत 'Ela' ('Elayachi' वरून 'Ela' हे नांव घेतले) हे रेस्टॉरंट सुरू केले. त्यालाही लोकांनी उत्तम प्रतिसाद दिला. जागा कमी पडू लागली. म्हणून २०२३ मध्ये आम्ही 'Ela' नवीन मोठ्या जागेत हलवले. आणि जुन्या 'Ela'च्या जागेत 'Mango Marcado' हे नवीन रेस्टॉरंट सुरू केले. इथे सूप, सँडविच, सॅलड असा Delicatessen सारखा मेन्यू आहे. वाईन, बीयर आणि वेगवेगळी ड्रिंक्स पण मिळतात."



*Fun times with Aai*

*In the kitchen*

इतक्या थोड्या दिवसात पुष्कर तीन वेगवेगळ्या तऱ्हेची रेस्टॉरंटस अतिशय यशस्वीरीत्या  चालवतो आहे. त्याची ही प्रगती सर्व मराठी लोकांना अभिमानास्पद आहे. ह्या यशात त्याचा भागीदार Andrew Dugard चाही मोठा वाटा आहे. पुष्कर शेफ म्हणून सर्व मेन्यू सांभाळतो तर Andrew मॅनेजर म्हणून काम करतो. आज त्यांच्याकडे १०० लोक काम करतात. पुष्कर अजूनही स्वतः शेफ म्हणून काम करतो आणि त्याच्याकडे काम करणाऱ्या शेफसना पदार्थ शिकवतो. त्याने स्टेज व एला ही दोन्ही रेस्टॉरंटस उघडतांना आई-वडिलांना भारतातून मुद्दाम बोलावले होते. त्याची आई कांही दिवस त्याला मदतही करत होती.

**मी**: "तुझे पुढे काय करायचे प्लॅनस आहेत?"

**पुष्कर**: "आम्ही 'Stage' रेस्टॉरंटची दुसरी शाखा लवकरच Boca Raton इथे सुरू करत आहोत. त्यामुळे साऊथ फ्लोरिडातल्या लोकांना सोईचे पडेल. त्यालाही जरूर भेट द्या. मला एक Cookbook लिहायची ईछ्या आहे. तसेच मला स्वतःचे ऑरगॅनिक फार्म सुरू करायचे आहे. त्यातील भाज्या, फळे मला माझ्या रेस्टॉरंटस मध्ये वापरायची आहेत."



Pushkar , Nicole
And
Toyam

पुष्करच्या Stage रेस्टॉरंटला अनेक प्रसिद्ध लोकांनी भेट दिलेली आहे. त्यात गोल्फ खेळणारे Rory Mcllroy, Vijaysingh, Shane Lowry, Dustin Johnson ह्यांचाही समावेश आहे. पुष्करला साऊथ फ्लोरिडा रीजनचे बेस्ट शेफ अवॉर्ड, सुप्रसिद्ध जेम्स बीयर्ड अवॉर्डचे नॉमिनेशन मिळालेले आहे. त्याच्याबद्दल USA Today, Palm Beach Post व इतर वेगवेगळ्या मासिकातून लेख लिहून आले आहेत. नुकताच ऑक्टोबरमध्ये त्याने भारतात जाऊन त्याचा चाळीसावा वाढदिवस साजरा केला. त्याच्या आजीचा तो खूप लाडका नातू आहे. त्याचा धाकटा भाउपण कॅनडामध्ये शेफ म्हणून काम करतो. पुष्करने आपल्या 'दर्पण'साठी त्याच्या रेस्टोरंटमध्ये सर्वांना आवडणाऱ्या पचडीची रेसिपी दिली आहे. त्याबद्दल त्याला धन्यवाद! पुष्करला त्याच्या नवीन 'Stage' रेस्टॉरंटसाठी आणि नवीन प्रकल्पांसाठी खूप शुभेच्छ्या! त्याची भविष्यकाळात अशीच भरभराट व प्रगती होत राहो ही सदिछ्या!

**लेखिका - सुजाता साठे**
sujatass@hotmail.com

# साहित्याचे माणिकमोती

## पहिले पैसा फिर भगवान

जाई कॅफेमध्ये चुळबुळत रिनाची वाट बघत बसली होती. रिना आली आणि तिचा जीव भांड्यात पडला.

"बरं झाल तू आलीस. माझी काळजी मिटली." ती रिनाला म्हणाली.

"एवढी काळजी करायची काय जरूर होती? आज नाही तर उद्या भेटलो असतो." रिना खुर्चीवर बसत म्हणाली.

"उद्या आपली भेट होण शक्य नाही. कसं सांगू तुला, समजत नाही." जाई म्हणाली.

रिना डोळे मोठ्ठे करत म्हणाली, "अस कोड्यात बोलू नकोस बाई! काय ते चटकन सांगून टाक."

वेटर आला. जाईने सँडविच आणि कॉफी आणायला सांगितली आणि हळूहळू बोलायला सुरवात केली.

" माझ्या लग्नाची अण्णा किती काळजी करतायत हे तुला माहिती आहे. त्यांच्याकडे हुंडा द्यायला फारसे पैसे नाहीत. त्यातून मी अशी सावळी."

तिचा ओघ तोडत रिना म्हणाली "टपोरे डोळे, कमानदार भुवया, सरळ नाक, उंच सडपातळ बांधा, जाई, तू सुंदर आहेस."

जाई म्हणाली, "आत्तापर्यंत पाच स्थळांकडून नकार आला."

रिना म्हणाली, "हुंड्यावाचून अडतय असं अण्णा बाबांना म्हणत होते."

जाईने तिच्याकडे दुर्लक्ष केले. "आता अण्णा बीजवर, खेड्यातली अशी मुल शोधतायत. त्यांना लवकर माझे लग्न करायचे आहे. तीन खोल्यांची आमची जागा. माझ लग्न झाल्याशिवाय विनूचे लग्न करता येत नाही, ही पण काळजी त्यांना लागलीय."

रिना म्हणाली, "हे सर्व मला माहिती आहे. तू कोड्यात काय बोलत होतीस ते सांग."

जाई म्हणाली, "मला तुला एक सनसनाटी बातमी सांगायचीय."

रिना म्हणाली, "चटकन सांग."

जाईने अडखळत सुरुवात केली, "दोन महिन्यांपूर्वी मी एक जाहिरात पाहिली. अमेरिकेतल्या एका मुलाला भारतीय मुलीशी लग्न करायच होत. ज्या मुलींना त्याच्याशी लग्न करायची ईच्छा असेल त्यांना त्याने माहिती आणि फोटो पाठवायला सांगितला होता."

रिनाने विचारले, "मग तू त्याला उत्तर पाठवलंस?"

"हो, पाठवल", जाई म्हणाली. "मी खरं ते लिहिल. मी इंग्लीश घेऊन B.A. केलय. आता एका कंपनीत नोकरी करतेय. वडील माझे लग्न जमवायचा प्रयत्न करतायत. हुंडा द्यायला त्यांच्याकडे पैसे नाहीत. म्हणून ते वयाने मोठे,

बिजवर असे नवरे शोधतायत. मला हे लग्न नको आहे, म्हणून मी हे पत्र पाठवतेय. मी ऑफिसचा पत्ता व फोन दिला."

"मग?" रिनाने उत्कंठतेने विचारले.

जाई म्हणाली, "मला वाटल त्याला हजारो सुंदर मुलींची पत्रे गेली असतील. पण आश्चर्य म्हणजे त्याच मला उत्तर आल. आलेल्या पत्रातून त्याने तीन मुली निवडल्या होत्या आणि त्या तिघींना भेटायला तो भारतात येत होता. त्या तिघींपैकी मी एक होते."

"मी घाबरले. पूर्ण परका अमेरिकन माणूस. त्याच्याबरोबर एवढ्या लांब एकटीने अमेरिकेत कसं जायच? मी 'नाही' म्हणूनच सांगायच ठरवल. पण एका आठवड्याने त्याचा फोन आला. मी त्याला 'मी माझे मत बदलल आणि मला तुला भेटायच नाही' असे सांगितले. तेव्हा त्याने विनंती केली की मी एवढ्या लांबून आलोय तर निदान एकदा तरी भेट. मी राहतो त्या हॉटेलच्या रेस्टोरंटमध्ये ये. नाही तर तुला हवे तिथे मी येईन. तुझ्या घरी येऊ का?"

"हो ना करतांना मी तो राहात होता त्या हॉटेलमध्ये दुपारी १२ वाजता लंचला भेटायच कबूल केल. आपण साधी माणसं! तो राहात होता त्या महागड्या हॉटेलात माझ्या ओळखीचे कोणी भेटायचा संभव नव्हता. तरी माझ्या मनात धाकधूक होती. आमचे अण्णा सनातनी! त्यांना या भेटीबद्दल कळल असत तर माझ्यावर आकाश कोसळल असत. त्याने मला हॉटेलचे नांव व पत्ता दिला. हॉटेलच्या मुख्य दरवाजात उभा राहतो आणि निळा शर्ट घालतो असे तो म्हणाला. मी हॉटेलात पोचले. त्याने मला लगेच ओळखले. तो माझ्याकडे आला. सहा फूट उंची, गोरा रंग, निळे डोळे, भुरे केस! प्रथमदर्शनीच मला तो आवडला. आम्ही रेस्टोरंटमध्ये गेलो. त्याने खुर्ची ओढून माझ्यासाठी धरली. वेटर मेन्यू घेऊन आला. मी सँडविच तर त्याने चिकन टिक्का मसाला, पालक पनीर, भात व पराठे मागवले.

मग तो स्वतःबद्दल सांगू लागला. "मी लहान होतो तेव्हा आमच्या घराजवळ एक भारतीय कुटुंब राहायचे. ते मराठी बोलायचे. त्यांचा साधारण माझ्या वयाचा एक मुलगा होता. त्याच नांव यशवंत. त्याला 'यश' म्हणायचे. यशबरोबर माझी मैत्री झाली. त्याला एक मोठी बहीण होती. मी एकटाच होतो. मला बहीण-भाऊ नाहीत. मी जसा मोठा होऊ लागलो, तस माझ्या आई-वडिलांचे पटेनास झाल. त्यांच्या भांडणांना कंटाळून मी यशच्या घरी खेळत असे. ते जेवायला बसले की माझे पण पान मांडत. मी वरण, भात, भाजी असे सर्व खात असे आणि ते मला आवडायच. यशच्या घरी आजी होती. ती मराठीच बोलायची. तिच बोलण ऐकून मला मराठी समजू लागल. मी "मला बेसन लाडू पाहिजे, चकली पाहिजे" असे तिला सांगत असे."

"मग त्याने दोन फोटो काढले. हा माझा त्यांच्या घरी गणपतीची आरती करतांनाचा फोटो आणि हा भाऊबीजेचा. त्याची बहीण मला ओवाळतांनाचा फोटो. त्याने इंग्लीशमध्ये बोलतांना ओवाळ हा शब्द वापरला. मग तो म्हणाला, "मी तेव्हाच ठरवल होत की मराठी मुलीशीच लग्न करायच. अमेरिकेत मी मराठी मुली शोधल्या. पण ते जमल नाही. म्हणून जाहिरात दिली. आलेल्या उत्तरात तीन मराठी मुली होत्या. त्यातली तू मला आवडलीस. मला मध्यमवर्गीय इंग्लीश येणारी मुलगी हवी होती. तशी तू आहेस. मी श्रीमंत नाही. मध्यमवर्गीयच आहे. माझं मशीनरी दुरुस्त करण्याच दुकान आहे. तुला प्रत्यक्षात बघितल्यावर तू मला आणखीच आवडलीस. तुझे डोळे खूप बोलके आहेत."

रिनाने विचारले, "तो कसा दिसतो?"

जाईने पर्समधून एक फोटो काढून तिला दाखवला. गोरा रंग, भुरे केस, हिरवे डोळे.

“वा! एकदम हॅंडसम! माझ्यासाठी कुणीतरी असा शोध ना!” रिना म्हणाली.

जाई हसली, “मी टाकलेले फासे कसे पडतात ते आधी बघू.” ती म्हणाली.

“पुढच सगळं भरभर घडल. मी त्याला चार पाच वेळा भेटले. मला तो खरंच आवडला. तो खरं सांगतोय याची मला खात्री पटली. पुष्कळदा परदेशस्थ मुलींना फसवून नेतात, मग तिथे कामाला जुंपतात, वाममार्गाला लावतात अशा अफवा मी ऐकल्या होत्या. तो म्हणाला, “तुझा पासपोर्ट तू तुझ्याजवळ ठेव. मी तुझ्या नावांवर तुझ्या बँकेत एक लाख रुपये ठेवतो. परत आलीसच तर तू कफल्लक नसशील.” मग माझी पासपोर्ट, व्हिसा ही सर्व कामे करावी लागली. शेवटी आम्ही ठरवलं की लग्न केल तर व्हिसा चटकन मिळेल. अमेरिकन एम्बसीमधल्या एका माणसाच्या मदतीने लग्न केल. व्हिसा मिळाला. आज मी पाचच्या विमानाने न्यूयॉर्कला जाते आहे. हा माणूस सच्चा आहे ग!”

“तू माझी सख्खी चुलत बहीण. त्यापेक्षाही जीवश्च कंठश्च मैत्रीण म्हणून तुझ्यावर हे कठीण काम सोपवते.” जाईने आवंढा गिळला. “माझ विमान पांच वाजता सुटेल. ते सुटल्यावरच तू आमच्या घरी जा आणि आई-अण्णांना काय झाल ते सांग.”

रिना म्हणाली, “बाई ग! तू मला धक्क्यावर धक्के दिलेस आणि आता तर तू मला तोफेच्या तोंडी देतेयस. अण्णांना, तुझ्या जमदग्नी वडिलांना मी ही बातमी कशी सांगू? ते मला फाडून खातील.”

जाई म्हणाली, “रिना, प्लीज एवढे काम कर आणि उद्या माझ्या ऑफिसात हा राजीनामा दे.”

मग तिने पर्समधून आणखी एक पाकीट काढले. “हयात दहा हजाराच्या नोटा आहेत. आई-अण्णांना जरूर लागेल तेव्हा दे. पाकिटावर माझा अमेरिकेतला पत्ता व फोन आहे. तो तू कोणालाही देऊ नकोस. हे पैसे तुझ्याकडे ठेव.” तिने ते पाकीट रिनाला दिलं आणि “आता मला जायलाच हव.” अस म्हणत ती छोटी बॅग घेऊन कॅफेबाहेर पडलीही!

रिना थोडा वेळ तशीच बसून राहिली. तिच डोकं भणभणत होत. मग ती सरळ घरी गेली. तिथून ऑफिसला ‘बरं वाटत नाही’ म्हणून फोन केला. तिच्या आईला ‘मला बरं वाटत नाही’ असं सांगून आपल्या खोलीत जाऊन पडली. शेवटी चार वाजता ती उठली. तिच्या आईने तिच्यासाठी चहा केला होता. तो पिऊन ती आईला म्हणाली, “आई, आपल्याला अण्णांकडे जायला हवं. त्यांना एक स्फोटक बातमी सांगायचीय.”

आईने रिनाकडे बघितल आणि ती म्हणाली, “ एवढं काय झाल?”

रिना म्हणाली, “जाईने एका अमेरिकन माणसाशी लग्न केलय.”

आई म्हणाली, “काहीतरी बरळू नकोस.”

रिनाने हळूहळू तिच्या आईला दुपारी काय झालं ते सांगितल. आई खालीच बसली.

रिना म्हणाली, “आई, तू माझ्याबरोबर अण्णांकडे चल. मला फार भीती वाटतेय.”

आई म्हणाली, “तुझ्या बाबांना कामावरून परस्पर अण्णांकडे यायला सांगते. ते आपल्या मोठ्या भावाला शांत करतील.” त्यांनी रिनाच्या बाबांना फोन करून अण्णांकडे बोलावल. मग त्या म्हणाल्या, “तुझे बाबा आणि अण्णा एकाच कर्मठ घरात वाढले. दोघेही नोकरीसाठी मुंबईला आले. अण्णा खेड्यात होते तसेच राहिले. तुझे बाबा इथल्या प्रगतीशील समाजात मिसळले. त्यांच वाचन चौफेर आहे. ते अण्णांना शांत करतील. निदान तसा प्रयत्न करतील.”

त्या दोघी व बाबा एकाच वेळी अण्णांकडे पोचले. जाईची आई “चहा ठेवते” म्हणत स्वयंपाकघरात गेली. चहा पिऊन झाल्यावर रिनाने सुरुवात केली. “आज दुपारी जाई अमेरिकेला गेली.” खोलीत एकदम शांतता पसरली. “तिने एका अमेरिकन माणसाशी लग्न केलय. ती आत्ता विमानात आहे.”

“गोऱ्या किरीस्तावाशी लग्न!” अण्णा उसळले. “कारटीने आपल्या तोंडाला काळं फासलं! कुलबुडवी! त्यापेक्षा जीव कां नाही दिला तिने? आमच्या हिच हे कौतुक! मुलीला मोकाट सोडल.”

अण्णांच आकांड-तांडव चालू असतांनाच जाईचा भाऊ विनू आला. सगळ्यांकडे बघत तो म्हणाला, “काय झाल?”

“काय झाल? तुझी बहीण किरीस्तावाचा हात धरून अमेरिकेला पळून गेली.” अण्णा म्हणाले.

“काय?” विनू आश्चर्याने म्हणाला. “अमेरिकेला गेली? मस्त झाल. अण्णा तिथे साधी नोकरी केली तरी खूप पैसे मिळतात. एका डॉलरचे कितीतरी पैसे होतात. अण्णा मला केव्हापासून हॉटेलिंगचा कोर्स करायला फॉरेनला जायचंय. आता ताई मला पैसे पाठवेल.”

“कारट्या, बहीण परक्याचा हात धरून पळून गेली आणि तू खूष झालायस! तिच्याकडून पैसे मागवणार आहेस?” अण्णा तडतडले. “ह्यापुढे ती आपल्याला मेली, समजलास!”

“अण्णा, शांत हो. जे घडल ते बदलता येणार नाही.” बाबा बोलले.

“सांगतोय ना! ती आपल्या कुटुंबाला मेली.” अण्णा उसळले. जाईची आई डोळे पुसू लागली.

विनूने रिनाला विचारले, “तुझ्याकडे तिचा पत्ता आहे का?”

“नाही.” रिनाने खोटेच सांगितले.

“पत्ता कशाला? सांगतो ना ती आपल्याला मेली.” अण्णा म्हणाले.

“अण्णा, शांत हो. आपण थंड डोक्याने विचार करू या.” बाबा म्हणाले.

आई म्हणाली, “काकू, आपण स्वयंपाक करू या.”

रिना, तिची आई आणि काकू तिघी स्वयंपाकघरात गेल्या. बाहेर अण्णांचा थयथयाट चालूच होता. काकू सारख्या डोळे पुसत होत्या. शेवटी म्हणाल्या, “मला जाईची फार काळजी वाटते. हे तर आता तिचे नांवही काढू देणार नाहीत. पण रिना, तुला तिची कांही खबरबात समजली तर मला कळव. हे बिजवर, व्यंग असलेले, खेड्यातले असे नवरे शोधत होते. म्हणून तिने हा अतिरेकी निर्णय घेतला असणार.”

जाई अमेरिकेला एका गोऱ्या माणसाबरोबर पळून गेली, ही वार्ता सर्व कुटुंबियांत वाऱ्यासारखी पसरली. आणि दुसऱ्या दिवशी रिनाच्या बाबांना त्यांच्या खेड्यात राहणाऱ्या चुलतभावाचा फोन आला.

"अरे बापू," रिनाच्या वडिलांना सगळे बापू म्हणत. "आपली जाई गोऱ्या किरीस्तावाबरोबर अमेरिकेला पळून गेली, हे खरं का?"

बापू म्हणाले, "हो, खरंय."

"मग तिला एक निरोप दे. आपल्या घराची विहीर पडकी झालीय. शिवाय आपलं देऊळ आहे ना, जिथे मी पूजा करतो, कथा-कीर्तने होतात, ते पण पडीक झाल आहे. जाई ते देऊळ नीट बांधायला पैसे पाठवेल कां विचार. अमेरिकेत सोन्याच्या विटा असतात असं ऐकल आहे. आपल्या देवळासाठी थोडे पैसे मागावे असा विचार केला."

बाबांनी कपाळाला हात लावला. "विचारतो." ते म्हणाले.

रिनाच्या आईने विचारले, "काय म्हणतायत?"

"जाईला देऊळाची आणि विहीरीची दुरुस्ती करायला पैसे पाठवायला सांग असे म्हणतायत."

आई वैतागली. "मुलगी अमेरिकेला गेली. खुशालीच पत्रही नाही आलं आणि हे पैसे मागतात? आणि भाऊ हॉटेलिंगच्या कोर्सला पैसे मागतोय. हे खेड्यातले चुलतकाका कट्टर सोवळं पाळतात. त्यांच्या गाभाऱ्यात फक्त ब्राह्मणांना जायची परवानगी असते. ते किरीस्तावाचे पैसे घेऊन देऊळ दुरुस्त करून घ्यायला तयार आहेत? तरी अजून सगळ्या नातेवाईकांना समजलेल नाही. त्यांना कळल्यावर ते पण पैसे मागायला सुरुवात करणार का? ह्या तमाशाला काय म्हणायच?"

बाबा म्हणाले, "पहिले पैसा, फिर भगवान!"

**लेखिका - ललिता गंडभीर**
lalitagandbhir@hotmail.com

# साहित्याचे माणिकमोती

## गुजगोष्टी – माझ्या भवतांलाविषयीच्या

जीव सृष्टीमध्ये सर्वांत तळाशी असलेल्या झाडा-फुलांबरोबरच माणसाच नातं कांही वेगळंच आहे. आपल्या भवतांलाकडून कमीत कमी अपेक्षा ठेवत झाडं आपल्या मुळा-खोडांनी, फांद्यांनी, पाना-फुलांनी आणि फळांनी जीवसृष्टीला सतत कांही ना कांही देत असतात. ह्या व्यवहारात देणारी झाड आणि घेणारी जीवसृष्टी म्हणजे कीडे-मुंग्या, पशू-पक्षी, माणसं कोणीही वृक्षविरहित भवतांलाची कल्पनाही करू शकत नाहीत. माझ अत्यंत लाडके पुस्तक The Giving Tree सोप्या भाषेत हेच सांगते.

माणसाची ही निसर्गाशी जवळीक करून राहायची आवड किंवा कधी कधी निकड ही प्रकट रूप धारण करते ती जुन्या तुपाच्या डब्यात तुळशीचे रोप लावून, खिडकीबाहेरच्या जागेत एखादी कुंडी ठेवून किंवा छोटया गॅलरीत २-३ फुलांच्या कुंड्या ठेवून. जन्मापासून शहरातल्या घरात राहणारी मीही एक होते. आईच्या घराला ३ गॅलरीज होत्या. त्यातल्या मोठ्या गॅलरीत ४-५ झाड कुंड्यांमध्ये लावून आम्ही आमची बाग फुलवली होती. १-२ गुलाबाची झाड, पावसाळ्यात फुलणारा सोनटक्का आणि गुलाबी नाजुक फुलांची लिली.

आजोबांचे घर कर्जतजवळ वैजनाथ म्हणून छोटे गांव आहे, तिथे होते. त्यांच्या घरात पुढच्या अंगणात एक मोठं पांढऱ्या चाफ्याचे झाड होते. देवपूजेला निषिद्ध असलेल्या त्याच्या पांढऱ्या फुलांचा खच जमिनीवर पडलेला असे. त्या फुलांच्या अंगठ्या करून एकेका हातात ३-३ अंगठ्या घालून मिरवायचा आमचा आवडता उद्योग असे. काकांचा उसाचा मळा होता. उसाशी काही गुजगोष्टी झाल्या नाहीत. मात्र मळ्यात गुळ तयार होत असे. ते बघायला मजा येत असे. मंगळागौरीच्या निमित्ताने पावसाळ्याच्या दिवसांमध्ये गांवाला गेलं तर काकांच्या मळ्यात काम करणारे कातोडी कुड्याच्या आणि इतर फुलांचा ढीग आणून टाकीत.

गांवाला देवळात दरवर्षी उत्सव होत असे. उत्सव तीन दिवसांचा असे. सगळे गांवकरी उत्साहाने सहभागी होत असत. आमच्या घरावर जेव्हा ही जबाबदारी असे, तेव्हा माहेरपणाला आलेल्या आत्या, चुलत बहिणी, काकू ह्यांच्याबरोबर बसून कीर्तनकार बुवांसाठी घरातल्या बागेतल्या गुलाबाच्या फुलांचा भरघोस हार आणि साखर-खोबऱ्याची खिरापत बच्चे कंपनी उत्साहानी करीत असे.

पुढे लग्न होऊन एखादं वर्ष झालं आणि आम्ही गेलो नेफामध्ये. ७-८ महिने पडणाऱ्या प्रचंड पावसामुळे इकडे निसर्ग आपलं वेगळं, अनोखं रूप दाखवत असतो. उंच उंच बांबूंच्या आणि इतर वृक्षांच्या दाटींनी तयार झालेलं घनदाट जंगल, नजर न पोचणारे उंच वृक्ष, सगळ्या जीवांच्या रक्तावर पोसल्या जाणाऱ्या, गवतात लपलेल्या जळवा. घरा-घरांमध्ये जळणाकरता लाकडाचे ओंडके ओढून नेणारे हत्ती. माझ्या एक वर्षाच्या मुलीच्या डोळ्यांमधे आकाशाला भिडू पाहणारे वृक्ष, गवतात लपलेल्या जळवा, अवाढव्य हत्ती सारखंच आश्चर्य उमटवीत.

घरात काम करणाऱ्या माळ्यांनी सर्व बंगल्याभोवती जंगली गुलाबांचे सुंदर कुंपण घातले होते. खूप भाज्यांची, फळझाडांची - अगदी ऊससुद्धा - लागवड केली होती. घरचं हळद, तिखट, फळं, भाज्या अशी समृद्धी होती. नेफामध्ये राहणारे काही सुशिक्षित आणि चतुर आदिवासी आमच्यासारख्या बाहेरून आलेल्या लोकांना जरूर असेल

तर दुभत्या गाई भाड्याने देत. गाईंना बेसन, उडदाची डाळ असा खुराक आमचा नेपाळी माळी देई. गाई इतकं दूध देत, कीं दुधाचा खवा करून खव्याची ताटं शेजारच्या बंगल्यांमध्ये दिली-घेतली जात. शहरापासून दूर अशा एकाकी जागेत राहून तीन वर्षांनी पोट भरतं आणि डोळे आपापल्या प्रांताकडे लागतात.

तीन वर्षांनी आमची बदली मुंबईला झाली. थोडे दिवस मुंबईला राहून आम्ही गेलो शारजाला. तिथल्या वाळवंटात तेलाचे साठे सापडले आणि तिथल्या अरबांचे सगळे जीवनच बदलले. ह्या नव्याने श्रीमंत झालेल्या अमिरातींनी स्व:तात आणि देशात खूप बदल केले. आत्ताच शारजा भारतातल्या इंजिनीयर्स आणि बिल्डिंग कंत्राटदारांनी उभं केलं आहे असं म्हणणं चुकीचं ठरणार नाही. सगळीकडे मोठी मोठी शहरं वसली. टोलेजंग इमारती आणि सगळ्या जगभरातील सामानाने भरलेल्या बाजारपेठा! शारजाच्या नव्या कोऱ्या, मोठ्या घरात राहत असतांनाही हे कांही आपलं कायमचं वास्तव्याचे ठिकाण नाही ह्याची जाणीव कायम होती.

काळाची पावले ओळखून अमेरिकेत स्थायिक झालेल्या बहिणीच्या मदतीने १९८५ मध्ये आम्ही फ्लोरिडात येऊन दाखल झालो. फ्लोरिडात पाऊस भरपूर आणि शिवाय समुद्रकिनारा. आंबा, फणस, नारळ आणि सगळी भारतातली फळे, फुले इथे अगदी सहजपणे वाढतात.

माझं पहिलं आंब्याचं झाड माझ्या करेबियन शेजाऱ्याने दिले. नंतर दुसरे आंब्याचे झाड मी एका प्रदर्शनातून आणले. ह्या दोन्ही झाडांनी आतापर्यंत खूप आंबे दिले. त्याच्या शेजारीच नारळाचे आणि फणसाचे झाड आहे. नारळ खूप येतात. पाणी खूप गोड आहे पण मलाई नाममात्र! शेजारी राहणाऱ्या चिनी शेजारणीने छोटे फणसाचे रोप दिले. बघता बघता त्याचाही मोठा वृक्ष झाला आहे. फणसाच्या झाडाशी माझी फारशी ओळख नव्हती. अजूनही तो "बरका" की "कापा" जातीचा आहे मला माहिती नाही. फणसही खूप येतात आणि गरे अतिशय गोड आहेत.

फणसाच्या शेजारी आहे भारतातून आणलेले पारिजातकाचे झाड. गणपती-नवरात्रीच्या दिवसांत फुलांचा सडा पडतो. मी रात्री झाडाखाली चादर पसरून ठेवते आणि सकाळी गोळा करून आणते. माझ्या बागेत चिक्कू आणि कढ़ीलिंबही आहे. चिक्कू अगदी पातळ सालीचा आणि चवीला खूप गोड आहे. कढीलिंब इतका पसरतो की बरीच वर्षे त्याची रोपे करून मी जवळच्या भारतीय दुकानांत विकत असे.

पुढच्या दर्शनी भागात माझी फुलझाडे आहेत. वेगवेगळे गुलाब, अनंत आणि लाल-शेंदरी फुलांनी मोहरणारा गुलमोहोर! बाकी वेगवेगळी फुलझाडे कुंड्यांमध्ये मागे लावली आहेत. माझी बागेची आवड फ्लोरिडात आल्यावर छान पूर्ण झाली.

माझ्या आईला आणि आम्हाला पुढच्या ड्राइव्ह-वे मध्ये किंवा मागच्या पॅटीओत खुर्च्या टाकून बसायला फार आवडे. स्वच्छ सुंदर हवा, शांत भवतांल आणि बहरणारी बाग ह्याचा आनंद माझ्या आईने शेवटपर्यंत घेतला. आपला शांत, सुंदर भवतांल निर्माण करण्यात वृक्ष-वल्लींचा सिंहाचा वाटा आहे ना!

**लेखिका: शशिकला लेले**
shamoni100@yahoo.com

## साहित्याचे माणिकमोती

# रंगात तुझ्या मी

काय सांगू राणी तुला मी
जिंदगीची ही कहाणी
रंगात आज रंगली
तुझी नि माझी रीत निराळी ||

स्वप्नांचे तव रंग उधळी
नजरेची ही अबोल बोली
सांगून जाति भाव तुझे ते
ऐकु येती नि:शब्द ओळी ||

पायी पैंजण छमछम करिती
आसमंत ही गाती गाणी
सूर निराळा तो सापडता मग
मंजुळ वाहे झुळुझुळु पाणी ||

स्मितहास्य ते गाली सजता
घायाळ करी तू सांज सकाळी
कोमल तरंग तुझ्या मनाचा
गुणगुणती ती मंजुळ गाणी ||

येता जाता वाट पाहतो
कधी येती ते क्षण सामोरी
मोहक तुझे रूप ते पाहुनी
वाटे झाली पुरी आपुली ही कहाणी ||

कळुन चुकले मज आज हे
तुझ्याविना ना मनात गोडी
सप्त रंगात आज रंगली
तुझी नि माझी रीत निराळी ||

**लेखक - लाभेश शेवलकर**
labhesh.shewalkar@gmail.com

# साहित्याचे माणिकमोती


## नावांची उत्क्रांती

कांही नांव जगात फिरायला गेली
आणि पुनर्जन्म घेऊन वावरू लागली
प्रमिलाची पेमला झाली
मायाची मायरा झाली
जनीची जनिन झाली
सुमनची सुझन झाली
ॲलेक्सझांडरचा सिकंदर झाला
शरदचा शरोड झाला
अशी नावांची उत्क्रांती होते आहे
अखेर सारे जग एकच आहे

**लेखिका - ललिता गंडभीर**
lalitagandbhir@hotmail.com

# साहित्याचे माणिकमोती

## आठवणी




**लेखिका - सोनाली क्षीरसागर शिंगण**
Sunshine.33472@gmail.com

सफरनामा

## *Our German Venture*

"Mom, my prediction! You have an upcoming Europe tour in the near future!" said our son Ashish. He was calling from DC.




"What?" I said.
"Mom, the Government has offered me a job in Germany, and I have accepted it. Soon I will learn to speak German also. My posting is for 5 years." He sounded excited.
"5 years and where?"
I was totally surprised.
"Stuttgart - Germany mom!"
Now, I had never heard this name. I could hardly pronounce it.
Berlin yes, Munich yes, but Stuttgart?
"Yes Mom, Stuttgart. They have a US Army base there and I will have a chance to visit Europe too, work-related of course.
Do not worry mom, I am only 8 hours away from Miami."

So, it was settled and this summer of 2024, we flew on Lufthansa to Frankfurt and then to Stuttgart. When I saw Ashish after one year, waving at us, my heart jumped with joy!
While driving home, he explained that he lives in West Stuttgart. His building has 5 floors, and he lives on the second floor.

"I hope there is an elevator?" I asked.

"No Mom, there is no elevator. You must climb the curved wooden steps. This is Europe and there is a big walking culture." said Ashish.

"This area used to be rich Jewish quarters. All the buildings are old but very well built. During the Second World War, many buildings were bombed but mine never got hit. Everything from here is within walking distance of bazaar, restaurants, supermarkets, gyms, barber shops, banks, hardware stores, and so on. Little further is the downtown area with a beautiful mall and a variety of shops including pharmacy shops. King Street is famous and called as Shoppers' heaven." Ashish explained the area where he lived.

When we entered his apartment, it had wooden floors, and large bedrooms with tall, broad windows. From there one could see the traffic flowing below, including the long, big yellow buses.

Ashish said, "Public transportation is very good here. It takes me only 15 minutes to reach my base by car. Here is my routine. I am up by 6, I bathe, get ready and leave around 7:30. There are many breakfast places where one gets freshly baked croissants, very lightly sweetened pastries, and multi fruit laden waffles."







German cuisine 😋😋

He was too excited to cover all the info in a few breaths. "After work, I go for Gym, come home, shower again and have dinner. Then I relax. Mom, I can't cook like you but can make fish entrees that I love. If I miss Indian food, I order from Indian restaurant and fulfill my cravings. One of the best restaurants here is named 'Kashmir'."

"Great!" I said. Before our arrival, he had pre-arranged for us some items like Pani pooris, cutlets etc.

The city has about 700,000 people. Surprisingly about 40% of the people are immigrants. People are very sincere when it comes to work ethics and time. The city of Stuttgart was founded in the 10th century by Duke Liudolf and he named city" Stuotgarten" meaning stud farm for the horses as he breed them there for his Cavalry to face the invasion of Hungarian Dynasty.

Stuttgart is a cultural hub of Germany for World famous operas and Ballets. There are universities and very interesting Museums of Mercedes & Porche car companies. Both are manufactured here. Those were real highlights, and it was a pleasure to see the great collection of cars and history behind it when we visited them. The city is known as the 'Car Capital of Germany'.

At the center of Stuttgart lies it's main square, Schlossplatz. It's the largest square in Stuttgart and a crossover point between the city's shopping area, parks, castles and museums. Roads in the city have ups and downs like San Fransisco. The city has 3 big shopping malls, a variety of shops and restaurants in the downtown area and a big railway station, with modern amenities. There are shops there and one can shop, even when all businesses are closed on Sundays.
One can get a variety of breads in various shapes and sizes. 'Aldi' has even a small loaf of pistachio bread. Croissants are mouthwatering and freshly baked. That used to be our breakfast with coffee. Surprisingly there are totally vegan Turkish restaurants and are very popular.

Stuttgart also has a Marathi Mandal and at their cultural festival, we could savor Panhe, Kokum sarbat, Bhel, even Batata wadas and Sabudana khichadi. They celebrate all the festivals like Holi, Diwali, Ganpati etc. Indian Grocery stores were disorganized and no match to Patel brothers or all other Indian shops in USA.
Surprisingly, Chinese stores carry our spices, including saffron. Those are well organized and very

efficient. Indoor Farmers Markets are worth visiting. It is a complex of many booths, such as variety of breads, herbs, spices, Italian fresh pastas, sauces, variety of hot peppers, sausages and meats.

All over the city, there are quaint coffee shops with awesome desserts. I tried Cannolis with different fillings, such as orange cream, strawberry cream, chocolate cream and even rose cream!
All restaurants here, big or small, serve food in a very elegant style. Using mostly fine China plates.
In short, Stuttgart is a Commercial, Dynamic, Diverse and equally Authentic city.

We met a young Telugu couple there while strolling on the street. They have 2 bright kids. He works for Volkswagen. They are both Automobile Engineers. She invited us into their apartment and Ramesh got to taste the best South Indian coffee.





*Porsche factory and museum*

We are History buffs, so we visited the Dachau concentration camp, where Jewish people died in thousands towards the end of the Second World War. At the rich Jewish quarters in Stuttgart, one can see metal plaques in front of the houses that mention the names, where, and how they died.
The city was bombarded with 42,000 bombs in 3 years period and houses were destroyed along with a large number of people. Porsche, at that time, stopped production of cars and instead built airplane engines for Hitler's Air Force called "Luftwaffe".

We also visited the city of Nuremberg where the trial and sentencing were conducted in court for Nazi atrocities. Munich (locals call it Munchan) was another highlight of our travel. City square with beautiful shops, town halls, a main church, and a rich history. The Olympic Games were held there in 1972. There are classy Indian restaurants in all cities of Germany including Stuttgart. Best South Indian, as well as North Indian cuisine, is available.

In Munich, we had a pleasure to dine at a euro style Fondue place by the town square. We also did wine tours in France and Salzburg in Austria, home of the film Sound of Music. The area has beautiful mountains, lakes and lush green valleys. It is heaven for photographers and the film industry.



*Picturesque landscapes…on the way to Austria!*

The London visit was equally fruitful. West minister Abby, Buckingham palace, 10 Downing Street and PM Churchill's Bunker during Second World War were very unique icons of the city. Visit to Chaiwala place on Main Street of London said volumes of Indian Influence and strong presence of our culture. Savoring garma garam chai with samosas, Masala omelets etc in mid-afternoon was a delightful treat. One must visit Restaurant "Dhushum" in central London. It is not just food but a unique concept of Indian restaurant.

We returned home after two months with happy memories and the utmost care taken by Ashish including driving all over Europe in his car and putting up with seniors like us with patience.

❤️ to hear your comments.




लेखिका - शीला सोगल
sheelasogal@gmail.com

# खाना खजाना

## Local Vegetable Salad (Pachadi)

*Serves 4 to 6 people*

**Ingredients:**

1 cup grated or shaved carrots
1 cup grated cauliflower
1 cup yellow wax beans (blanched and 1/4 cup cherry tomatoes quartered
2 each thinly sliced watermelon and radishes
2 T cilantro chopped
1/4 cup of chopped roasted peanuts 1/2 cup grated calabaza(optional)
1/2 cup shaved red cabbage
4 cup shaved kale
1/3 cup of turmeric vinaigrette
1/4 cup chopped cilantro
Salt to taste

**Turmeric Vinaigrette**

**Ingredients:**
1 cup neutral oil (grape-seed oil, sunflower oil) 1/3 cup lemon juice
1/4 cup turmeric juice
1/4 cup ginger juice
2.5 T yellow mustard 1/4 cup agave syrup 2 tsp kosher Salt

**Method:**
- in a mixing bowl, mix all ingredients, dressing and radishes and season with salt.
- Add dressing, mix well
- garnish with shaved Radishes.

**For Vagar/ tempering**

**Ingredients**
1/4 cup neutral oil
2 T black mustard seeds 1/2 T asafetida/ hing

**Method:**

- mix everything in a mixing bowl over the ice. Except for the vagar/tempering ingredients.
- Heat the oil in a sauté pan.
- Turn the heat to low once oil is hot, add mustard seeds, once they start crackling, add asafoetida (bought in Indian ethnic/grocery stores)
- Add oil to the mixture, and mix vigorously with a whisk, season again with salt if necessary.
- Store in a container.

**शेफ पुष्कर मराठे**
(Owner of Stage, Ela and Mango Mercado Restaurants)

# खाना खजाना

## Tomato Basil Soup

**Ingredients:**

- 2 Tsp Olive Oil
- ½ Cup Carrot chopped
- 1 Cup Celery, chopped
- 1 large Tomato, diced
- 1 Tsp Paprika/Red chili powder
- 1 Tbsp Sugar
- 1 Tsp Salt
- 1 Tsp Black Pepper
- 1 Tsp Cumin Powder
- 1 (14oz) Canned Tomatoes in Basil
- 2 Tbsp Coriander leaves, chopped
- 2 Cups Veg Stock
- ½ Cup Fresh Basil leaves or 2 Tbsp Dried Basil
- ¼ Cup Cashews Cream
- Bread Bowls for Serving the Soup

  To Make Cashews Cream:
- 12-15 Cashews, soaked in hot water for ½ an hour

**Instructions:**

**To Make Cashews Cream:**

- In a blender jar, add soaked and drained cashews, and water 3-4 Tbsp.
- Blend the mixture to get a smooth and creamy cashew paste and keep aside.

**To Make Tomato Basil Soup in the Instant Pot:**

- Turn on the sauté mode of the instant pot and heat the olive oil.
- Add carrots, celery, tomato, canned diced tomato, sugar, black pepper, salt, and coriander leaves, and mix well.
- Add vegetable broth and mix all well (scrape the base of the pot).
- Close the instant pot lid and place the vent in the sealing position.
- Cook on Manual Mode (Hi) for 5 minutes.
- Natural Pressure Release (NPR) for 10 minutes and then release the remaining pressure manually.
- Open the lid and add basil leaves.
- Submerge the immersion blender into the pot and turn it on low.
- Blend until the mixture begins to smooth.
- Turn the speed to high and continue to blend until the desired soup consistency.
- Turn on the sauté mode of the instant pot.
- Pour cashew cream and stir well.
- Cook for a minute or two or until getting the desired consistency.
- Taste and adjust sugar, seasoning, and salt if needed.
- Creamy, soothing Vegan Tomato Basil Soup is ready to serve, served with toasted crusty bread or in a Bread Bowl as you like.

शेफ डॉ. शुभांगी कुंभार
drshubhi9@gmail.com
Owner at Niask Tasty Treats
Youtube: Aaichi Savali

सिनिअर्स कॉर्नर

## *WORLD ANESTHESIA DAY*




William T. G. Morton
American dentist and physician

This day is also remembered as World Ether Day.
This is an annual event celebrated around the world to commemorate the First successful demonstration of Diethyl Ether Anesthesia by William TG Morton on October 16, 1846.
This event ranks as one of the most significant events in the history of Medicine and took place in an Operating Theater ( now known as Ether Dome ) at the Massachusetts General Hospital, Boston, USA, home of the Harvard School of Medicine.
The discovery made it possible for patients to obtain the benefit of surgical treatment without the pain associated with an operation. Both Anesthesia and Surgery have made great strides since this historic day in 1846.




People watching the procedure from the observation galary in the operation theater

Anesthesia is a relatively new branch of Medicine. Surgery used to be performed before the dawn of this specialty, but it used to be barbaric. A quick amputation of a badly injured limb in a war casualty was, of course, performed using alcohol as an intoxicant. A surgery lasting more than a few minutes was rarely possible until the advent of Anesthesia. It was only then that a precise, planned surgical procedure for the treatment of medical conditions became available.
The way Anesthesia is done now is vastly different from how it was done by Morton in 1846. This is a similar comparison to the Wright brothers' first aircraft flight in 1903. The way airplanes fly now is vastly different than how it was in 1903. However, the Wright brothers as well as, William Morton opened the door to a vast goldmine of science, technology, innovation, and our understanding of physics and physiology.



Massachusetts general hospital staff witnessing the event as William Morton, at the head-end of the table

No one would have thought then that this is how the planes would fly in 2024 or this is how an anesthetic would be performed in 2024. It would seriously stretch one's imagination!
Human innovation knows no limits!

Dr. Neelkanth Palkar
लेखक - डॉ. नीलकंठ पालकर
nrvrpal@aol.com

# किड्स कॉर्नर

## *“Seasons Slow and Tame”*

In nature’s grand ballet, where colors dance and play,
The seasons tell their stories, in a gentle, endless sway.
From spring’s colorful blossoms to winter’s quiet sleep,
A cycle of renewal, where life and time upkeep.

Spring bursts with life, in shades bright and true,
Summer's golden sunlight, a warm and endless hue.
Autumn's leaves fall, in a cascade of red and gold,
Winter's breath is silent, a stillness draped in cold.

In Florida though, the seasons gently blend,
A timeless, warm continuum, where summer doesn’t end.
The spring is just a whisper, the autumn barely calls,
Winter's fleeting presence, behind summer's sunny walls.

Palm trees sway in rhythm, beneath a constant sun,
A land of endless beaches, where seasons meld as one.
The days are bright and balmy, a tropical refrain,
In Florida’s gentle seasons, change is slow and tame.

**लेखिका - तन्वी भिडे**
vetravati@gmail.com
(Previously published in Desh-Videsh Magazine)

# किड्स कॉर्नर

## *"The Search"*

She searches and searches
for her to be found
but no—-
Nobody is around

Wandering in the woods
in the air, in the water
but still
No sign of her

After all that hard work
she is tired and sleepy
Staying up late
In the dark, it's creepy

She comes across a mirror
looking at a girl
she looks lost in its view
But with a quick twirl:

She finally realizes
with all her glee
little had she known
the one to be found was she

लेखिका – अवंती भिडे
vetravati@gmail.com
(Previously published in Desh-Videsh Magazine)

# किड्स कॉर्नर

## दिवाळी


दिवाळी, हिंदू लोकांचा मोठा सण आहे. भारता प्रमाणे अमेरीके मध्ये पण मज्जा करतो. दिवाळी ला आई खुप फराळ बनवते. लाडु, चकली, आणि शंकरपाळे सगळे बनवते. आम्ही फटाके पण फोडतो. आम्ही लक्ष्मी ची पुजा करतो. MMOSF चा दिवाळी कार्यक्रम ला पण खुप मजा यैते. आम्ही मराठी शाळेची मुले मिळुन कार्यक्रम करतो.

अन्वित शेवलकर
वयः ११ वर्ष

**लेखक – अन्वित शेवलकर**
labhesh.shewalkar@gmail.com

# किड्स कॉर्नर


मेल्वा देशमुख तिच्या मुलाबरोबर लेक वर्थच्या शाळेत जाते. आणि स्वतःपण मराठी शिकते. तिने खाली स्वतःबद्दल लिहिले आहे.


माझा नवरा मराठी आहे पण
मी अमेरिकन आहे. ह्या वरषी
मी माझ्या मुला बरोबर मराठी
शाळेत जाते. तीचरस आणी
मुलानी माझ स्वागत केल. मी
खुप मराठी शब्द आणी वाक्य
शिकले. दर रविवार शाळे मदे
मज्ञा करते.
- मेल्वा देशमुख
Lakeworth Shala

**लेखिका - मेल्वा देशमुख**
Melva.seal@gmail.com

# किड्स कॉर्नर

Maharashtra



I Love ♡ Maharashtra

Maharashtra has a king called Shivaji Maharaj. He was one of the brave fighters of Maharashtra. He fought for good. Maharashtra's famous fort is Raigad fort. We are called Maharashtrians. Our state capital is Mumbai. Maharashtra has many cities such as Nagpur, Satara, Kolhapur, Nasik, and Pune. I was born in Nasik. Maharashtra is a great place to live.

Jai Maharashtra

Parth Kardel
Age: 9 years
Marathi Shala, Lakeworth

**लेखक - पार्थ कर्डेल**
tambepoonam@gmail.com

# किड्स कॉर्नर




**चित्रकार – अक्षित शेवलकर**
labhesh.shewalkar@gmail.com

# किड्स कॉर्नर

गणेश




**चित्रकर्ती - नलिनी काळे**
geetanjalisk@gmail.com

# किड्स कॉर्नर

गणेश




अनुषा काळे

**चित्रकर्ती – अनुषा काळे**
geetanjalisk@gmail.com

# प्रश्नमंजुषा

## म्हणी पूर्ण करा *(प्रश्नमंजुषेची उत्तरे पुढील दर्पण सदरात दिली जातील)*

1. अंगाचा ___ पापड होणे.
2. अंगात नाही ___ आणि ___ घेउन पळ.
3. अंथरूण ___ ___ पसरावे.
4. ___ खाती जमा.
5. अठरा ___ दारिद्र असणे.
6. अडला हरी ___ __ धरी.
7. अडली ___ अन ___ खाय.
8. अडाण्याचा गेला ___, वाटेवरची ___ काढा.
9. अति परीचयात ___.
10. अनुभवल्याशिवाय ___ नाही, ______ गिळत नाही.
11.अति ___ भीक माग.
12. असतील ___ तर ____ भुते.
13. अंगाची ___ ___ होणे.
14. अंधारात केलेतरी ____ आले.
15. अगं अगं___, मला ___ नेशी?
16. अठरा विश्व ___ त्याला _____ उपाय
17. अडाण्याची गोळी ___ गिळी
18. हातच्या _____ ____ कशाला
19. हा ___ आणि हा ____
20. हात दाखवून _____
21. ___ होऊन ___ ओढण्या पेक्षा, ___ होऊन ___ खाल्लेली बरी
22. सुभं ___ पण ___ जळत नाही
23. ____ खाणार त्याला ___ देणार
24. ____ भुंकण्याला ___ देईना किंमत
25. शेरास ___शेर
26. वासरात ___ ___ शहाणी
27. ___ तेल ___वर
28. ___पण देगादेवा ___ ___चा रवा
29. ___ थोडी ___ फार
30. ___ लहान ___ ___ महान
31. ___ वसेते___ दिसे
32. भरंवशाच्या ___ला ___
33. बोलाचीच ___ बोलाचाच ___
34. ___ गेला अन ___ केला

35. बुडत्याला ___ आधार
36. बडा __ ___ वासा
37. पी ___ आणि हो __
38. _तीचे__ अळणी
39. नव्याची ____
40. नकटीच्या ___ ____ विघ्न
41. दोन __ शेजारी, __ नाही ___
42. देणं न __ आणि ___ लावून येणं
43. दुसऱ्याच्या __तील ___ दिसतेपण स्वतःच्या डोळ्यातील ___ दिसत नाही
44. दुःख __ला न डाग ___ला
45. दिल्या ___चा सांगितल्या ___चा
46. दांत ___ __ भरणे
47. दक्षिणा तशी ___.
48. ___ची नाही ___ आणि __ची नाही ____
49. तुझी __ __ दे पण माझी __ __ दे
50. तवा ___ तोवर ___ भाजून घ्यावी

**लेखिका - रसिका जोशी**
rasika_j@hotmail.com

# उत्तर सांगा पाहू?

## नाट्य दर्पण (उत्तरे)

१. सी_ स्व_व_ = **सीता स्वयंवर**
२. तो _ न_च = **तो मी नव्हेच**
३. सं_त __द्र = **संगीत सौभद्र**
४. कु_म _ _ह_ _ले = **कुसुम मनोहर लेले**
५. मी _ _ _म _ _से _ _तो_ = **मी नथुराम गोडसे बोलतोय**
६. ती _ _ _णी = **ती फुलराणी**
७. क_ _ _ _ _त _ _ली = **कट्यार काळजात घुसली**
८. स_ _ _ बा_ _ _ = **सखाराम बाईंडर**
९. स_ता _ _दर _ _ _पे = **सविता दामोदर परांजपे**
१०. जाण_ _जा = **जाणता राजा**
११. शा_त_ = **शाकुंतल**
१२. म_गंधा = **मत्स्यगंधा**
१३. स_स्त_ _ग = **सन्यस्तखडग**
१४. किच_ _ध = **किचक वध**
१५. सं_ _ मा_ _ _न = **संगीत मानापमान**
१६. टू_टू_ = **टूरटूर**
१८. मो_ची _व_ = **मोरूची मावशी**
१९. ए_च _ला = **एकच प्याला**
२०. म_ना_ _ _री = **मदनाची मंजिरी**
२१. शां_ता! _ _ _ _ आहे = **शांतता! कोर्ट चालू आहे**
२२. ले_ _ _दं_ _ली = **लेकुरे उदंड झाली**
२३. ऑ_ द _स्ट = **ऑल द बेस्ट**
२४. न_ _म्रा_ = **नटसम्राट**
२५. सा_खं का_ _री हो_ _ = **सारखं काहीतरी होतंय**
२६. चा_ _ _स प्रे_ _ = **चार दिवस प्रेमाचे**
२७. गे_ मा_व कु_ _डे = **गेला माधव कुणीकडे**
२८. सा_ _ _ल्ले_ मा_स = **साखर खाल्लेला माणूस**
२९. सू_ _ _ल्ले = **सूर्याची पिल्ले**
३०. वस्त्र_ _ण = **वस्त्रहरण**

३१. न_ _त _रे घ_ले = **नकळत सारे घडले**
३२. को_ म्ह_तं ट_ दिला? = **कोण म्हणतं टक्का दिला?**
३३. जर _ _ _ गोष्ट = **जर तरची गोष्ट**
३४. नि_ _ व _टी _गू = **नियम व अटी लागू**
३५. अ_ _ फोटो _ _ _ = **अमर फोटो स्टुडिओ**
३६. का_ रा_ = **काळी राणी**
३७. द पर_ _ म_ _ = **द परफेक्ट मर्डर**
३८. चा_चौ_ = **चारचौघी**
३९. यू म_ डा_ = **यू मस्ट डाय**
४०. दी_ _भ = **दीपस्तंभ**

**लेखिका - रसिका जोशी**
rasika_j@hotmail.com